International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.2 Nov-Dec 2022

# भारतातील मार्क्सवाद, फुले - आंबेडकरवाद आणि कामगार आंदोलन

**डॉ वाल्मीक कीर्तीकर**
सहाय्यक प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग प्रमुख, छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज सोलापूर
**Corresponding Author- डॉ वाल्मीक कीर्तीकर**
**Email- kirtikarwalmik@gmail.com**
**DOI- 10.5281/zenodo.14614181**

**गोषवारा**

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारतात कामगार चळवळीचा उदय आणि विकास विविध परिपेक्षातून झालेला आहे. कामगार आंदोलनाच्या संदर्भात मार्क्सवादाचे विश्लेषण असे आहे की कुठल्याही समाजात दोन वर्ग असतात. कामगार आणि भांडवलदार वर्गाच्या संघर्षाची परिणिती साम्यवादात होते या सिद्धांताला सर्वप्रथम जागतिक स्तरावर मूर्त स्वरूप रशियामध्ये लेनीनने दिले व तेथे कामगार आंदोलनातून कामगारांचे राज्य प्रस्थापित झाले. या घटनेचा परिणाम भारतातील कामगार आंदोलनावर होणे स्वाभाविक होते परंतु रशियात जसा कामगारांचा एक स्वतंत्र वर्ग निर्माण झाला आणि त्याने या कामगार आंदोलनाचे नेतृत्व केले तसे भारतात होणे शक्यच नव्हते कारण भारतातील कामगार आंदोलनाला जातीचा आधार होता किंबहुना भारतात स्थापन झालेल्या कामगार संघटनांची स्थापना जातीय, पक्षीय आधारावर झाली व त्या सर्व कामगार आंदोलनांनी आपापले हितसंबंध सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला यामध्ये फुले आंबेडकरवादी कामगार संघटनांची भूमिका मार्क्सवादी कामगार संघटनांपेक्षा सुरुवातीच्या काळापासून स्वतंत्र आणि वेगळी राहिलेली दिसून येते.

सदरील संशोधन लेखात भारतातील मार्क्सवाद, फुले - आंबेडकरवाद आणि कामगार आंदोलन. या बाबतीत चिकित्सक आढावा घेण्यात आला आहे.

**उद्दिष्टे**

1) भारतातील मार्क्सवाद फुले आंबेडकरवाद आणि कामगार आंदोलनाचा अभ्यास करणे

2) भारतातील मार्क्सवाद फुले आंबेडकरवाद आणि कामगार आंदोलनाची प्रासंगिकता अभ्यासणे

**गृहीतके**

1) भारतातील मार्क्सवादी विचारावर पाश्चात्य विचारसरणीचा प्रभाव आहे

2) फुले आंबेडकरवादी विचार हा वर्ग संघर्षाऐवजी भारतातील जातीय प्रश्न आणि समस्याच्या अनुषंगाने विचार करतो

3) भारतातील कामगार आंदोलने विशिष्ट जातीय, पक्षीय आणि विचारसरणीचे हितसंबंध जोपासताना दिसून येतात

**अभ्यासपद्धती**

प्रस्तुत संशोधन लेखा दुय्यम साधनांच्या आधारे लिहिण्यात आलेला आहे त्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, साप्ताहीके, मासीके, इंटरनेटवरील विविध वेबसाईट इत्यादीचा वापर करण्यात आला आहे

**भारतातील कामगार संघटना**

आयटक म्हणजेच ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस या संघटनेची स्थापना 1920 मध्ये समाजवादी गांधीवादी आणि मार्क्सवादी विचारधारेच्या लोकांनी एकत्र येऊन केली तसेच साधारणतः 1925 च्या दरम्यान भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना भारतामध्ये झाली पुढे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वातंत्र्योत्तर भारतात म्हणजेच 1947 ला मध्यवर्ती कामगार संघटनेमधून बाहेर पडून काँग्रेस पक्षाने इंटक या संघटनेची स्थापना केली 1948 मध्ये समाजवादी विचारसरणीच्या लोकांनी यामधून फुटून हिंद मजदूर सभा नावाची संघटना निर्माण केली पुढे कम्युनिस्ट पक्षातील

विभाजनामुळे कम्युनिस्ट पक्ष मार्क्सवादी यांनी 1970 मध्ये सीटू म्हणजेच सेंट्रल ऑफ इंडियन ट्रेड युनियन या संघटनेची स्थापना केली अशा प्रकारे मार्क्सवादी विचारसरणी जर वर्ग संघर्ष मानत असेल तर भांडवलदार या एका वर्गाच्या विरोधामध्ये लढण्यासाठी विविध विचारसरणीच्या कामगार संघटनांची मिळून एकच मजबूत कामगार संघटना ठेवणे आवश्यक असताना भांडवलशाहीच्या विरोधात लढण्याकरता भारतीय कामगारांना वेगवेगळ्या चार भागांमध्ये विभागण्यात आल्याचा इतिहास आपल्यासमोर आहे.

याशिवाय जनसंघ नावाचा एक राजकीय पक्ष 1970 च्या दशकामध्ये निर्माण झाला या राजकीय पक्षांनी स्वतःच्या विचारसरणीची भारतीय मजदूर संघ नावाची संघटना स्थापन करून कामगार चळवळीमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला उपरोक्त कामगार चळवळीचा इतिहास बघता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे एक विधान अत्यंत महत्त्वाचे वाटते ते असे की, भारतीय कामगारांना विभाजित करून आपला हेतू साध्य करणाऱ्या राजकीय पक्षांनीच खऱ्या अर्थाने भारतातील कामगार चळवळीचा सर्वनाश केला आहे.

**भारतातील मार्क्सवाद**

मार्क्सवादाचा कट्टर प्रणेता कार्ल मार्क्सच्या मते, धर्म ही अफूची गोळी आहे या त्याच्या प्रसिद्ध विधानाचा अर्थ लक्षात घेता भारतीय मार्क्सवादावर कार्ल मार्क्सच्या वरील विधानाचा प्रभाव असल्याचे दिसून येते कारण जगभरातील मार्क्सवादी हे वर्ग संघर्षाचे विश्लेषण करतात परंतु हे विधान भारतीय संदर्भातील अपूर्ण चिंतन असल्याचे दिसून येते. मार्क्सवादी विचारसरणी ही वर्ग संघर्षाला एकक मानून विश्लेषण करते परंतु फुले आंबेडकरवाद वर्ग संघर्षासोबतच जाती संघर्षाची भारतीयांच्या संदर्भात आवश्यकता आहे. हा वास्तववादी विचार भारतीय कामगारांना देतात. या संदर्भाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे एक वाक्य खूप महत्त्वाचे वाटते ते असे म्हणतात की ,भारतामध्ये एक मनुष्य एक मत असे ठरले आहे परंतु एक मनुष्य एक मूल्य प्रस्थापित होणे बाकी आहे थोडक्यात काय तर आर्थिक व सामाजिक क्षेत्रात यांचे शोषण केले जात आहे जेव्हा या आर्थिक व सामाजिक शोषणातून तो मुक्त होईल तेव्हाच खऱ्या अर्थाने भारताचे कल्याण होईल.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतातील कामगार चळवळ**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, भारतीय लोकशाही यशस्वी होण्यासाठी राजकीय व आर्थिक लोकशाही शिवाय सामाजिक लोकशाही महत्त्वाची आहे. जर भारतात आर्थिक, राजकीय आणि सामाजिक लोकशाही प्रस्थापित झाली तरच समता प्रस्थापित होऊ शकते तसेच भारतातील वर्ग व जाती संघर्ष नष्ट करण्यासाठी शक्तिशाली कामगार संघटनेची आवश्यकता आहे. कारण शक्तिशाली कामगार संघटना शासनावर नियंत्रण ठेवील आणि शक्तिशाली कामगार संघटनेच्या अनुयायामध्ये वाढ झाली की कालांतराने या कामगार संघटनेच्या माध्यमातून राजकीय सत्ता हाती येऊ शकते परंतु भारतातील पक्षीय - जातीय आणि विशिष्ट विचारसरणीच्या कामगार नेत्यांवर त्यांचा विश्वास नव्हता.

भारतातील वंचित कामगारांच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काही प्रश्न उपस्थित केले

त्यानुसार रेल्वे अस्पृश्य कामागारांना चहा किंवा फराळ करण्यास मज्जाव का केला? रेल्वे मालकीच्या विहिरी व बावडया अस्पृश्य कामागारांना पाणी भरण्यास का देत नाही? मोठमोठया स्टेशनवर अस्पृश्य पोर्टरना नोकरी वर ठेवण्यास बरेच ब्राम्हण स्टेशन मास्तर का विरोध करतात? अस्पृश्य कामगारातील लायक कामगारांना वरच्या दर्जाच्या नोकऱ्या मिळण्याबाबत स्पृश्यवर्गीय जाणून बुजून का अडथळा करतात? 12/02/1938 डॉ. बाबासाहेबांच्या या सवालांवरुन कामागारांच्या बाबतीतील डॉ बाबासाहेबांचा समानतेचा दृष्टिकोन लक्षात येतो. तत्कालीन सरकारला, तत्कालीन व्यवस्थेला डॉ. बाबासाहेबा आंबेडकरांनी विचारलेले हे खडे सवाल तळागळातील कामगांराच्या वेदनेची तीव्रता लक्षात येते.

या खेरीज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगार चळवळी विषयी जी भूमिका घेतली होती, त्या भूमिकेचा विचार करता त्यांनी काही महत्वाचे मुद्दे समोर मांडले होते – त्यानुसार शेतमजुरांना किमान मजूरी मिळाली पाहिजे. औद्योगिक कामगारांना पुरेसा पगार आणि पगारी सुरक्षा मिळाली पाहिजे. कामगारांच्या कामगार संघटनेला मान्यता मिळाली पाहिजे. कामगाराला वर्षातून 240 दिवस काम मिळाले पाहिजे व हे काम पूर्ण करणाऱ्यास कायम केले पाहिजे. कामगाराच्या कामाचे तास हे अनियंत्रित होते ते

निश्चित स्वरुपाचे आठ तास करण्यात यावेत. कामगाराचे काम करताना मृत्यु झाल्यास त्याला संबंधित कंपनीने अथवा मालकाने नुकसान भरपाई दिली पाहिजे. अशा प्रकारची भूमिका सातत्याने त्यांनी मांडलेली दिसते. या भूमिकांची विचार केला तर, कामगार चळवळीला आणि प्रत्यक्षात कामगाराला त्याच्या व्यक्तिगत जीवनात उभे राहण्यासाठी, त्याला सुरक्षा देण्यासाठी बाबासाहेबांनी किती मूलगामी विचार केला होता? हे आपल्या लक्षात येते.

12, 13 फेब्रुवारी 1938 मनमाड येथे दलित वर्ग कर्मचारी परिषद आयोजित करण्यात आले होते.त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हटले हेते, 'ब्राह्मणवादी आणि भांडवलशाही हे भारतीय कामगारांचे दोन शत्रू आहेत.' तथाकथित समाजव्यवस्थेचा बुरखा फाडुन स्वतंत्र मजूर पक्षाला नवा चेहरा कसा देता येईल? पक्ष मजबूत कसा होईल? कामगारांच्या हिताला सर्वाच्च प्राधान्य कसे दिले जाईल? असा दुरदर्शी पारदर्शी विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मनात घोळत होता त्यासाठी त्यानी सर्वव्यापी सर्वसमाज घटकांच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी देशव्यापी स्वतंत्र मजूर पक्षाच्या धेयधोरणात, कार्यपध्दीत आणि अंमलबजावणीत व्यापक असा सकारात्मक बदल घडवून आणला.

**संदर्भग्रंथ सूची**


1) अब्राहम, पी. अम्बेडकर का आर्थिक योजना और विकास में योगदान: इसकी प्रासंगिकता कनिष्क, 2002.
2) अग्रवाल, सुदर्शन, एड. डॉ. बीआर अंबेडकर, व्यक्ति और इनका संदेश: एक स्मारक खंड प्रेंटिस – हॉल ऑफ इंडिया, 1991.
3) अहीर, दीवान चंद, अम्बेडकर महान, ब्लूमून बुक्स, 2000.
4) डॉ. अम्बेडकर और भारतीय संविधान बुध्द विहार, 1973.
5) गोलमेज सम्मेलन, लंदन मे डॉ. अम्बेडकर, 1930-1932 ब्लूमुन बुक्स 1921.
6) रावसाहेब कसबे, आंबेडकर आणि मार्क्स, सुगावा प्रकाशन पुणे 1985.
7) रावसाहेब कसबे, आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना, सुगावा प्रकाशन पुणे 1985.
8) रावसाहेब कसबे, आंबेडकरवाद तत्व आणि व्यवहार, सुगावा प्रकाशन पुणे 2004.
9) उद्धव कांबळे डॉ. आंबेडकर दलित आणि मार्क्सवाद "नवे आकलन नव्या दिशा"
10) Cristophe Jaffrelot, Orient Blackswan, 2006 205 Pages. Understading Caste: From Buddha to Ambedkar and Beyond.
11) Gail Omvedt, Orient Blackswan, 2001, 124 Pages Dalits and the Democratic Revolution: Dr Ambedkar and the Dalit Movement in Colonial India.